जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR- **76** /2014
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक-:1.1.2015

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम **1949** चे अनुसूची **'ड'** चे प्रकरण-**2** मधीलनियम क्र.**1** अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम 1949 चे अनुसूचि (ड) चे प्रकरण 2 मधील नियम क्र .1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापौर श्री**.** अ.सत्तार अ.गफुर यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 09.01.2015 रोजी दुपारी 04.00** वाजता नांवाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै . शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजित केली आहे.

करीता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**

**(मा.महापौर यांचे मान्यतेने)**

**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रति,
श्री / श्रीमती -----------------------------------------
सदस्य /सदस्या, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**कार्यक्रम पत्रिका**

**विषय क्र. 1 :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे सुधारीत कलम 31(अ) मधील तरतुदीनुसार व महानगरपालिका व स्थायी समितीचे कामकाज अधिनियमातील 4-ब नुसार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर नामनिर्देशनानुसार 11 (अकरा) सदस्याची नियुक्ती (स्थायी समितीवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती केलेल्या सदस्याप्रमाणे) महासभेने दिनांक 24.12.2012 रोजी केलेली असून महानगरपालिका सभेचे कामकाज नियम 4-क नुसार प्रत्येक विशेष समिती तिची रचना झाल्याच्या तारखेपासून एक वर्ष मुदतीपूर्व काम करण्याचे चालू ठेवील अशी तरतूद आहे त्यामुळे महिला व बाल कल्याण समितीवर 11 सदस्याची निवड ही दि. 24.12.2013 पुर्वी महासभेस करावी लागेल. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे सुधारीत कलम 31 (अ) मधील तरतुदी नुसार महानगरपालिका व स्थायी समितीचे कामकाज नियमातील 4-ब नुसार नामनिर्देशनाव्दारे 11 (अकरा) सदस्यांची नियुक्ती हि मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनीक संख्याबळ विचारात घेवून करावयाची असून शासन राजपत्रानुसार खालील प्रमाणे मान्यता प्राप्त पक्षाचे नोंदणीकृत पक्षाचे/अपक्षाचे संख्याबळ असून त्या त्या पक्षाच्या नावासमोर दर्शविल्या प्रमाणे तौलनीकबळा नुसार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर सदस्यांची संख्या येते.

| **अ क्र.** | **पक्षाचे / अपक्षाचे संख्याबळ** | **तौलनीक बळ** | **पक्षास मिळणारी सदस्य संख्या** |
|---|---|---|---|
| 1 | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, अपक्ष, **(40)**<br>$\frac{40 \times 11}{80} = 5.50$ | 5.50 | 6 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, **(10)**<br>**10 x**11 = 1.37<br>80 | 1.37 | 1 |
| 3 | शिवसेना, भारतीय जनता पार्टीची आघाडी **(16)**<br>**17 x11** = 2.33<br>80 | 2.33 | 2 |
| 4 | अेआयएमआयएम, संविधान पार्टी **(13)**<br>13 **x11** = 1.78<br>80 | 1.78 | 2 |

करीता उपरोक्त प्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 30(1) अन्वये नावाशमनपाकेच्या पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीच्या अकरा जागांवर, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधियिम 1949 चे कलम 31-अ नुसार नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यासाठी मनपा सर्व साधारण सभे समोर प्रस्ताव सादर.

**टिप :-** ( मु.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे कलम 30(1) अ नुसार महिला व बालकल्याण समितीवरील सदस्यांपैकी किमान पंच्याहत्तर टक्के सदस्य हे महिला पालिका सदस्यांमधील असतील अशी तरतुद असल्यामुळे 75 टक्के प्रमाणे एकूण 8 महिला सदस्यांची नियुक्ती करावी लागेल )

**1)** शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण 2010/प्रक्र.-85/नवि-32 दि. 6 जुलै 2010 नुसार सभागृह नेते/विरोधी पक्षनेते मार्फत किंवा गट नेत्या मार्फत पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर तौलनिक संख्याबळाच्या आधारावर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी पाठवावे पाठवितांना ती बंद लखोटयात सभेच्या वेळी महापौरांकडे देण्यात यावीत. सभेच्या दिवसापुर्वी सदर नांवे महापौरांना बंद लखोटयात द्यावयाची असतील तर त्या पत्राची एक प्रत बंद लखोटयातच आयुक्तांना सुध्दा देण्यात यावी.

**विषय क्रं. 2**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावरील एकूण 09 वैद्यकिय अधिकारी/सहाय्यक वैद्यकिय अधिकारी कार्यरत असुल सदरील वैद्यकिय अधिका-यांची महानगरपालिकेस आवश्यकता व संबंधीतांचे काम समाधानकारक असल्याचे प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी अहवाल दिलेला असल्यामुळे सदरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना मनपा सर्व साधारण सभा ठराव क्रं. 49 दिनांक 19.07.2014 अन्वये दर महा एकत्रीत वेतन रुपये 25,000/- दरमहा देण्यास मान्यता प्रदान केल्यानुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/14402/14 दिनांक 10.11.2014 अन्वये लागु करण्यात आलेला आहे. इतर कंत्राटी कर्मचा-यांचे समान तारीख ठेवल्यामुळे खालील वैद्यकिय अधिका-यांनाही एकच तारीख ठेवणे आवश्यक असल्यामुळे संबंधीतांच्या नावा समोर देर्शविल्यानुसार त्यांचे मुदतवाढीचे तारखेस दुरुस्ती करुन मुदतवाढीची एकच तारखे ठेवणे आवश्यक आहेत

| **अ.क्र.** | **कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांचे नांव** | **पद** | **मुदतवाढ संपल्याची तारीख** | **तांत्रीक खंड दिनांक** | **पुढील मुदतवाढीचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | डॉ. प्रांजली पंकजराव जोशी | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | 31.03.2015 | 31.12.2014 | 01.01.2015 ते 29.06.2015 पर्यंत |
| 2 | डॉ. स्मिता गोविंदराव भट्टड | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | 31.03.2015 | 31.12.2014 | 01.01.2015 ते 29.06.2015 पर्यंत |
| 3 | डॉ. पल्लवी राजेंद्र तुंगेनवार | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | 31.03.2015 | 31.12.2014 | 01.01.2015 ते 29.06.2015 पर्यंत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | डॉ. मुजफर अमीना बेगम | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | 31.03.2015 | 31.12.2014 | 01.01.2015 ते 29.06.2015 पर्यंत |
| 5 | डॉ. राफे अ. खदीर | कंत्राटी वैद्यकिय अधिकारी | 30.12.2014 | 31.12.2014 | 01.01.2015 ते 29.06.2015 पर्यंत |
| 6 | डॉ. अन्सारी मो. राफे मो. इस्माईल | कंत्राटी सहाय्यक वैद्यकिय अधिकारी | 30.12.2014 | 31.12.2014 | 01.01.2015 ते 29.06.2015 पर्यंत |
| 7 | डॉ. रिजवान अहेमद गुलाम रसुल | कंत्राटी सहाय्यक वैद्यकिय अधिकारी | 30.12.2014 | 31.12.2014 | 01.01.2015 ते 29.06.2015 पर्यंत |
| 8 | डॉ. श्रुती रविंद्र कोटलवार | कंत्राटी महिला वैद्यकिय अधिकारी | 30.12.2014 | 31.12.2014 | 01.01.2015 ते 29.06.2015 पर्यंत |
| 9 | डॉ. विजया परसुराम राठोड | कंत्राटी महिला वैद्यकिय अधिकारी | 30.12.2014 | 31.12.2014 | 01.01.2015 ते 29.06.2015 पर्यंत |
| 10 | श्री सोळंके राम मारोतराव | कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस **TB/HIV** सुपरवायझर एकत्रीत वेतन रु. 15,000/- | 30.12.2014 | 31.12.2014 | 01.01.2015 ते 29.06.2015 पर्यंत |

करिता वरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी-9 यांना एकत्रीत वेतन रुपये 25,000/- व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस **TB/HIV** सुपरवायझर-1 यांना एकत्रीत वेतन रुपये 15,000/- यांची मुदत दिनांक 30.12.2014 रोजी सपंत असून त्यांना दिनांक 31.12.2014 चा एक दिवसाचा तांत्रीक खंड देवून दिनांक 01.01.2015 ते 29.06.2015 पर्यंत व पुढील नियमीत एक-एक दिवसाचा तांत्रीत खंड देवून पुढील मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव मनपा सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**विषय क्रं. 3**

मनपाकेच्या सर्व शाळेत बालवाडीचे वर्ग नसल्यामुळे नागरीक आपल्या पाल्यांना ज्या शाळेत बालवाडी वर्ग चालतात त्याच शाळेत प्रवेश देत असून व त्यानंतर पुढील शिक्षणासाठी सुध्दा त्याच शाळेत प्रवेश देत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. महानगरपालिकेच्या सर्व शाळेत बालवाडी वर्ग सुरु केल्यास विद्यार्थ्यांची संख्या वाढेल तसेच झोपडपट्टी भागातील नागरीकांचे 4 ते 5 या वयोगटातील मुले सुध्दा त्याचा लाभ घेऊ शकतील. महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेत बालवाडी वर्ग सुरु करण्यासाठी मराठी माध्यमाच्या 9 बालवाडया व उर्दु माध्यमाच्या 9 बालवाडया असे एकूण 18 बालवाडया सुरु कराव्या लागतील. सदर बालवाडया सुरु करण्यासाठी 18 बालकताईची 10 महिण्यासाठी शासन निर्णयानुसार प्रती महा मानधन रु. 3,000/- प्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरती करावी लागेल.

करिता मनपाकेच्या प्राथमिक शाळेत बालवाडी वर्ग सुरु करण्यासाठी मराठी माध्यमाच्या 9 बालवाडया व उर्दु माध्यमाच्या 9 बालवाडया असे एकूण 18 बालवाडया सुरु करण्यासाठी 18 बालकताईची 10 महिण्यासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शासनाने निश्चित केलेल्या रु. 3,000/- प्रतिमहा मानधन या प्रमाणे नेमणुक करण्यास मान्यता देऊन त्याकरिता लागणा-या खर्चास तसेच बालवाडी साहाय्यका व सेविका मनपा कर्मचा-यांमधून किंवा स्वतंत्रपणे नेमण्यास तसेच आवश्यक तिथे वर्गखोल्या, शैक्षणिक साहित्य, क्रिडा साहित्य, खाऊ व इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मनपा सर्व साधारण सभे समोर सादर.

**विषय क्रं. 4**

मनपा हद्दीत बीएसयुपी योजने अंतर्गत दुलेशाह रहेमान नगर मधुन जाणारा मुख्य रस्ता जो वाघी रोडच्या रस्त्याकडे जातांना भय्यासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेचे 3 प्लॉट, प्लॉट क्रं. 28, प्लॉट क्रं. 03, व प्लॉट क्रं. 04 हे रस्त्याच्या कामामध्ये बाधीत होत आहेत. प्लॉट क्रं. 28 नुसार मधुकर तुकाराम पंडीत यांचा पूर्ण प्लॉट, प्लॉट क्रं. 03 ब्रम्हाजी विठ्ठल गच्चे यांच्या प्लॉटमधील 8 फुट, प्लॉट क्रं. 04 मुंजाजी मानेजी राजभोज यांच्या प्लॉटचा कांही भाग रस्त्याच्या कामासाठी आवश्यक आहे.

बीएसयुपी योजने अंतर्गत दुलेशाह रहेमान नगर मधुन जाणारा मुख्य रस्ता वाघी रोडच्या रस्त्याकडे जातांना भैय्यासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थे मधील प्लॉट क्रं. 03, चे मले श्री ब्रम्हाजी विठ्ठल गच्चे, प्लॉट क्रं. 04 चे मालक श्री मुंजाजी मानेजी राजभोज व प्लॉट क्रं. 28 चे मालक मधुकर तुकाराम पंडीत यांच्या प्लॉटमधून रस्त्यासाठी लागणारी जलागा वाटाघाटीत संपादीत करुन करण्याकरिता मान्यतेस्तव सर्व साधारण सभे समोर सादर.

**विषय क्रं. 5** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत प्रभारी आयुक्त व उपआयुक्त यांच्या बदलीमुळे, कर वसुली व पाणी टंचाई काळात निर्माण झालेल्या परिस्थितीवर चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**सुचकः**- आनंद शंकरराव चव्हाण **अनुमोदक** ः- विनय पाटील, स.विरेंद्रसिंघ गाडीवाले, स.शेर अली महेबुब अली, गिल सरजीतसिंघ मेजर पंजाबसिंघ, गफार खान गुलाम महमंद खान, सौ. सुदर्शना खोमणे

**विषय क्रं. 6** **प्रस्ताव**

महाराष्ट्र शासनाचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. खा. श्री अशोकरावजी चव्हाण यांच्या मंत्रीमंडळाने सन 2009 ला मराठवाडयातील औरंगाबाद विभागीय कार्यालयाचे विभाजन करुन नांदेड येथे दुसरे विभागीय आयुक्त महसुल कार्यालय सुरु करण्याचा घेतलेला निर्णय, मा. उच्च न्यायालय खंडपिठाच्या निर्णय व भौगोलीक परिस्थत्ती, गुणवत्त्तेच्या आधारावर महाराष्ट्र शासनाने दिनांक 02 जानेवारी 2015 रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार नांदेड येथे दुसरे विभागीय आयुक्त कार्यालय सुरु करण्यासाठी दावे व हरकती मागविण्यात आलेल्या असुन शासनाने घेतलेल्या या निर्णयाचे हि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वानमुते अभिनंदन, व समर्थन करते व तसेच लवकरात लवकर नांदेड येथे दुसरे विभागीय आयुक्त कार्यालय सुरु करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांच्याकडे व महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करते.

**सुचक** ः- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** ः- विनय पाटील

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.